॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

जा.क्र.उमवि/७-ब./फार्मसी/४९७/२०२१ दिनांक: २२ फेब्रुवारी २०२१

## अत्यंत महत्वाचे

प्रति,

**मा.प्राचार्य,**
कबचौउमविशी संलग्नीत सर्व
**औषधनिर्माणशास्त्र** महाविद्यालये,

विषय:- माहे. नोव्हें./ डिसें, २०२० च्या प्रथम ते चतुर्थ वर्ष औषधनिर्माणशास्त्र वर्गांचे अंतर्गत मुल्यमापनाचे गुण Online सादर करणेबाबत..

संदर्भ:-विद्यापीठाचे परीपत्रक क्रं.१७६/२०११, दि.२१.सप्टेंबर,२०११.

महोदय/महोदया,

वरील विषयाच्या अनुषंगाने, कळविण्यात येते की, प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्ष औषधनिर्माण शास्त्र शै.व.२०२०-२०२१ मधील, माहे नोव्हें./ डिसें, २०२० च्या प्रथम ते चतुर्थ वर्ष औषधनिर्माणशास्त्र वर्गाच्या (शै.व.२०२०-२०२१ मधील प्रथम/तृतीय सत्रासाठी नियमीत प्रवेशीत विधार्थी वगळता) अंतर्गत मुल्यमापनाचे गुण Online पध्दतीने वर्ग व शाखा तसेच विषय कोड नमुद करुन upload करावेत.

### अ) गुणयाद्या सादर करण्याची मुदत : -

| अ.नं. | तपशील | गुण सादर/Upload दिनांक... |
|---|---|---|
| १ | B.Pharmacy {(CGPA} (सत्र १ ते ८) वर्गाच्या अंतर्गत गुणयाद्या/ Performance Ledger व Consolidated Export Report | दिनांक ०५/०३/२०२१ पर्यत |
| २ | B.Pharmacy (OLD) अभ्यासक्रमाचे अंतर्गत गुण. | दिनांक ०५/०३/२०२१ पर्यत |
| ३ | प्रथम व व्दितीय वर्षाच्या पर्यावरणशास्त्र विषयाचे गुण. | दिनांक ०५/०३/२०२१ पर्यत |
| ४ | द्वितीय, तृतीय वर्ष व चतुर्थ वर्ष बी.फार्मसी (OLD) सत्र पध्दत अंतर्गत गुण. | दिनांक ०५/०३/२०२१ पर्यत |

## ब) इतर सुचना : -

(१) विद्यापीठाकडून **औषधनिर्माण शास्त्र** नवीन अभ्यासक्रमाचे अंतर्गत गुण शाखा निहाय विषयासह विद्यार्थ्याचे बैठक क्रमांक व नावांची नोंद असलेले छापील को-या गुणयाद्या पाठविण्यात आलेल्या आहेत. संबंधित परीक्षकांनी स्वत:च्या हस्ताक्षरात गुणयादीवर गुणांची नोंद करुन त्यावर स्वाक्षरी करावी.

(२) जुन्या अभ्यासक्रमाच्या,प्रात्यक्षिक परीक्षांना यापूर्वीचीच पध्दत अवलंबवावी.

(३) गुणयाद्यांमध्ये परीक्षकांकडून गुणात खाडाखोड अथवा गिरवागिरव झाल्यास त्या गुणांसमोर अंकी व अक्षरी गुणांची नोंद करुन परीक्षकांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

(४) गुणयादीवर Whitener चा वापर करु नये, Whitener चा वापर केलेला असल्यास गुण याद्या स्वीकारल्या जाणार नाहीत. तशा सूचना परीक्षकांना देण्यात याव्यात.

(५) प्राचार्य यांनी उपरोक्त नमूद केलेल्या अंतिम मुदतीच्या तारखे पर्यंत गुण Portal वर Online पध्दतीने upload करावेत.

(६) गुण upload करतांना विद्यापीठ कार्यालयास काही त्रुटी आढळल्यास संबंधित **परीक्षकांना स्वखर्चाने विद्यापीठ कार्यालयास येवून त्रुटीचे निराकरण करावे लागेल.** याबाबतही प्राचार्यांनी परीक्षक/प्राध्यापकांना सूचित करावे. निर्धारीत मुदतीनंतर प्राप्त होणा-या गुणयाद्यांना उपरोक्त संदर्भ पत्रानुसार दंड आकारणी करण्यात येईल. याची नोंद घेवून वर नमूद केल्याप्रमाणे परीक्षांचे गुण Online पध्दतीने upload करून विद्यापीठास सहकार्य करावे,

(२) **<u>अ) अनुक्रमांक १ करिता</u>** - **औषधनिर्माण शास्त्र** वर्गाचे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून सुधारित करण्यात आलेला असून, याकरिता CGPA + PCI पॅटर्नचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांचे Continuous Assessment संबंधित विषय शिक्षकांकडून होत असते व या मूल्यमापनाच्या आधारे विषय शिक्षक हे गुणदान करीत असतात.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम,व्दितीय,तृतीय व चतुर्थ वर्ष (Fresh + Repeater) (शै.व. २०२०-२०२१ मधील प्रथम/तृतीय सत्रासाठी नियमीत प्रवेशीत विधार्थी वगळता) /CGPA+ PCI Pattern अभ्यासक्रमास ई सुविधेतंर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण MKCL ने विकसीत केलेल्या ONLINE ADES सॉफ़्टवेअरद्वारे संगणकात नोंदणी करावयाची असून याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे. ONLINE ADES च्या USERNAME व PASSWARD बाबत गोपनियता पाळावी. सॉफ्टवेअर हाताळणीबाबतची सादरीकरण संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१) ADES सॉफ़्टवेअरद्वारे सर्व गुणांची नोंद (Entry)करण्यात यावी.

२) विषयवार गुणयाद्या प्रिंट करुन,त्या मुळगुणयाद्यावरुन गुण तपासण्यात यावेत.

३) यात काही दुरुस्ती असल्यास, त्या पुन्हा सॉफ़्टवेअरमध्ये घेण्यात याव्यात व त्याची Correction List प्रिन्ट करुन खात्री करावी.

४) Performance Ledger हे विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावे व त्यातील त्रुटीचे निराकरण करण्यात येवून योग्य त्या दुरुत्या On line software मध्ये घेण्यात याव्यात.

५) सर्व दुरुस्त्या झाल्यानंतर Performance Ledger प्रिंट करण्यात यावे

६) Online ADES CD सॉफ़्टवेअरद्वारे तयार झालेल्या Export Report ची Print संबंधित संबंधित महाविद्यालयाने विद्याशाखेत जमा करावी. सदरचा रिपोर्ट हा महाविद्यालयीन लॉगीनमध्ये Assessement Data Entry-->> Report>> Consolidated Report या Link द्वारे संबंधित परीक्षा विभागाच्या विद्याशाखातंर्गत कालांतराने जमा करावयाची आहे. तसेच सदरहु रिपोर्टची प्रिंट घेण्यापूर्वी सर्व विषयांच्या गुणांच्या नोंदी पूर्ण झालेल्या आहेत किंवा नाहीत याबाबतची खात्री केल्यानंतरच सदरचा रिपोर्ट तयार करावयाचा आहे. त्याकरीता रिपोर्टमधील Remaining Entries या कॉलममध्ये **'O'** व is Exported या कॉलममध्ये **'YES'** असणे आवश्यक आहे.

७) महाविद्यालयांनी, प्रथम,व्दितीय,तृतीय व चतुर्थ वर्ष बी. फार्मसी वर्गाची (CGPA + PCI) अंतर्गत गुणांची विषयवार Correction List व Performance Ledger मा.प्राचार्यांनी स्वाक्षांकित केलेली छापील प्रत शाखानिहाय व वर्गनिहाय स्वतंत्र नस्तीमध्ये यथावकाश संबधित विद्याशाखेत सादर कराव्यात. Performance Ledger प्रिंट आऊट मधील गुण व प्राध्यापकांनी विषयवार दिलेले गुण सारखेच असावेत अन्यथा याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांची राहील.

८) ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन परीक्षा अर्ज भरलेले असतांना देखील अंतर्गत गुणांची नोंद वरील सॉफ्टवेअर मध्ये होणार नाही अशा विद्यार्थ्यांचे गुणांची नोंद विद्यापीठाने पुरविलेल्या गुणयादयाप्रमाणे गुणयादी तयार करण्यात यावी व त्याबाबतच्या सविस्तर खुलाशासह अशा नोंदीची स्वतंत्र पाकीटात सादर करण्यात यावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी जुन्या अभ्यासक्रमातून परीक्षा दिलेली आहे व त्यांची गुणयादी विद्यापीठाकडून उपलब्ध झाली नाही अशा विद्यार्थ्यांकरीता देखील विद्यापीठाच्या गुणयादीप्रमाणे गुणयादी तयार करुन त्यांचीही स्वतंत्र पाकीटात पाठविण्यात यावी व सदर पाकीटावर तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

**प्रात्याक्षिक/तोंडी परीक्षा (बहिस्थ) आयोजना संदर्भात आपणास यथावकाश कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी ही विनंती.**

म.कळावे,

**आपला विश्वासु**

**Sd/-**
**सही**
**संचालक,परीक्षा व**
**मुल्यमापन मंडळ,**

प्रत: माहिती/कार्यवाहीसाठी करीता :-
१) संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग,उमवि,जळगांव यांचे कार्यालय.
२) संगणक केंद्र प्रमुख, (परीक्षा व मुल्यमापन मंडळ), उमवि, जळगांव.
३) समन्वयक, E- सुविधा कबचौ उमवि, जळगांव.